बजेट- महत्वाचे

क्र.पोमस/३३/७१२५/कार्यासन संकिर्ण/२९/२०२३ दिनांक:- २६/०२/२०२४

सन २०२३-२४ या वित्तिय वर्षातील मागणी क्र.बी-१, २०५५ पोलीस या मुख्यलेखाशिर्षाअंतर्गत असलेल्या विविध उपलेखाशिर्षाखाली घटकांच्या मागणीच्या अनुषंगाने अनुदानाच्या उपलब्धतेनुसार सर्वच घटकांना वेगवेगळया उद्दिष्टांमध्ये अनुदानाचे वाटप करण्यात आलेले आहे.

**घटक कार्यालयांच्या मागण्यांचा आढावा घेतला असता अनेक घटकांकडून अतिरिक्त अनुदानाची मागणी करण्यात येत आहे, मात्र वितरित करण्यात आलेले अनुदान पुर्ण प्रमाणात घटक कार्यालयांकडून खर्च करण्यात येत नसल्याचे दिसून येत आहे.**

तरी घटक कार्यालयांनी वितरीत करण्यात आलेल्या निधीमधुन खर्च करतांना पुढीलप्रमाणे **दक्षता** घ्यावी:-

१. घटक कार्यालयांनी उपलब्ध असलेल्या /प्राप्त होणा-या निधीमधुन त्यांच्याकडील प्रलंबित देयकांचा आढावा घेऊन त्यांचा निपटारा **तात्काळ** करण्यात यावा.

२. घटक कार्यालयांना निधी वितरण हे त्यांच्या मागणीच्या अनुषंगाने निधीच्या उपलब्धतेनुसार अनुदानाचे वाटप करण्यात आले आहे. सदरचा १००% निधी ३१ मार्च २०२४ पुर्वी खर्च होणे अपेक्षित आहे. त्यामुळे घटक प्रमुखांनी सन २०२३-२४ या वित्तिय वर्षातील देयके ३१ मार्च पूर्वी पारीत होण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी. प्राप्त झालेले अनुदान ३१ मार्च २०२४ पुर्वी खर्च होणार नसेल तर अनुदानाचा आढावा घेऊन तात्काळ योग्य त्या कारणासह उर्वरित अनुदान या कार्यालयास सर्मपित करण्यात यावे. जेणेकरुन इतर घटक कार्यालयांना सदरचे अनुदान वितरित करणे शक्य होईल. कुटल्याही उद्दिष्टांखाली अनुदान अखर्चित राहिल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित घटक कार्यालयांची राहिल याची नोंद घ्यावी.

३. तरी, घटक प्रमुखांनी त्यांना बीडीएस प्रणालीवर उपलब्ध करुन दिलेले अनुदान पुर्ण खर्च झाल्यानंतरच आवश्यकता असल्यास अतिरिक्त अनुदानाची मागणी सुधारीत विवरणपत्रामध्ये योग्य ते समर्थन नमूद करुन या कार्यालयाकडे सादर करावी.

27/2/24

(डॉ.निखिल गुप्ता)
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचे करिता.

प्रति,

मा.पोलीस महासंचालक, लोहमार्ग, मुंबई (सस्नेह)
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.राज्य मुंबई
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सहीत)
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य पुणे

E:\Rashmi 2023-2024\memo.docx6

अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल,म.राज्य मुंबई/वाहतूक/ नागरी हक्क संरक्षक,मुंबई/
महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग, मुंबई/
आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई/ फोर्स वन, मुंबई/
दळणवळण व परिवहन विभाग, म.राज्य पुणे/
प्रशिक्षण व खास पथके, मुंबई
संचालक, पोलीस बिनतारी संदेश, म.राज्य पुणे
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल नागपूर/पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, म.राज्य पुणे
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, गडचिरोली
सर्व पोलीस अधीक्षक, जिल्हे/लोहमार्ग/बिनतारी संदेश
सर्व समादेशक राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १ ते १६ (भा.रा.ब.सह)
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण शाळा
प्राचार्य, अपारंपारिक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर
प्राचार्य, गुन्हा प्रकटीकरण शाळा, नाशिक
कार्यकारी अभियंता, वाहतुक अभियांत्रिकी पथक, मुंबई
पोलीस महानिरीक्षक यांचे उप सहायक (लेखा)/ कार्यासन अधिकारी का.क्र.३२
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.१७,१७-अ,१८,१९,१९-अ, २१-अ, २७, २८,२८-अ, ३० व ४०

प्रत पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी:-

२/- पोलीस उपअधीक्षक, संगणक कक्ष, पोमसं, कार्यालय, मुंबई
यांना विनंती करण्यात येते की, सदरचे परिपत्रक दि.३१ मार्च २०२४ पर्यंत वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावे.